इचलकरंजी ICHALKARANJI ▸ वर्ष -४१ ▸ अंक - ३४१ ▸ बुधवार,ता.१५ एप्रिल २०२६ ▸ पाने १२
इचलकरंजी आर.एन.आय.रजि.नं.63119/94 • पोस्टल रजि.नं. KLR/78/ 2024-2026

### ट्रम्प यांचा मोदींशी दोनवेळा संपर्क

नवी दिल्ली,ता.१४–

इराण आणि अमेरिकेमध्ये चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरल्यानंतर आता डोनाल्ड ट्रम्प यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी फोनवरुन चर्चा केल्याची माहिती आहे. डोनाल्ड ट्रम्प आणि नरेंद्र मोदी यांच्यामध्ये तब्बल ४० मिनिटे चर्चा झाल्याची माहिती आहे. इराण युद्ध आणि भारत-अमेरिका संबंधावर चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. अमेरिका आणि इराण या दोन देशांदरम्यान युद्ध थांबवण्यासाठी चर्चेची पहिली फेरी निष्फळ ठरली. त्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी मोदींशी चर्चा केल्याने त्याला महत्व प्राप्त होत आहे.

राष्ट्रीय विचाराचे एकमेव निर्भिड दैनिक

# महासत्ता

कोल्हापूर – सांगली – सातारा – बेळगांव

### म्हाडा घोटाळा : बिल्डरांची चौकशी

नाशिक,ता.१४–

मनपा हद्दीत म्हाडा घरकुल घोटाळ्यातील फसवणुकीप्रकरणी बड्या विकासकांवर गुन्हे दाखल केल्यानंतर त्यांची एसआयटीमार्फत चौकशीदेखील सुरू आहे. दरम्यान, महापालिकेनेदेखील बांधकाम विकासकांची चौकशी सुरू करत त्यांची सुनावणी घेतली जात आहे. मनपाच्या नगररचना विभागाकडून विकासकांना नोटिसा बजावल्यानंतर दोन दिवसांत शंभर जणांची सुनावणी घेण्यात आली आहे. दरम्यान, नोटिसा बजावलेल्यांमधील काहींनी मनपाची परवानगी न घेताच बांधकाम केल्याचे समोर आले आहे.

www.emahasatta.com   e-mail : mahasatta@gmail.com   mahasattaadvt@gmail.com   किंमत ₹ ५.००

## महाराष्ट्रात उष्णतेची लाट

### अकोल्यात सर्वाधिक ४४ अंश तापमान

■ मुंबई,ता.१४–

राज्यात सध्या तीव्र उष्णतेची लाट जाणवत असून विदर्भासह



अनेक भागांत तापमानाने उच्चांक गाठला आहे. सर्वाधिक तापमान अकोला जिल्ह्यात ४४ अंश सेल्सिअस नोंदवले गेले असून, अमरावतीत ४३.८ अंश आणि सोलापूरमध्ये ४३.२ अंश तापमानाची नोंद झाली आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांमध्ये उकाडा आणि आरोग्याचा धोका वाढला आहे.

या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने राज्य उष्णता कृती आराखडा आणि भारतीय हवामान विभागाच्या (आयएमडी) रंग-कोडेड उष्णता सतर्कतांच्या अनुषंगाने तीन स्वतंत्र मानक कार्यपद्धती (एसओपीज) जारी केल्या आहेत. या एसओपीजचा उद्देश उष्णतेच्या (पान २ वर)

## खासदारांची संख्या ८५० होणार

■ नवी दिल्ली,ता.१४–

**केंद्र सरकारने लोकसभेतील एकूण जागा ५४३ वरून ८५० करण्याचा प्रस्ताव ठेवला असून यासंबंधीचा मसुदा विधेयक खासदारांसोबत शेअर करण्यात आला आहे. प्रस्तावानुसार ८५० पैकी ८१५ जागा राज्यांना आणि ३५ जागा केंद्रशासित प्रदेशांना देण्याची तरतूद करण्यात आली आहे.**

हा बदल लागू करण्यासाठी संविधान दुरुस्तीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असून संविधानातील कलम ८१ मध्ये सुधारणा करण्याची योजना सरकारकडून आखण्यात आली आहे. यासाठी १६ एप्रिलपासून संसदेचे तीन दिवसांचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले आहे. या अधिवेशनात महिला आरक्षण विधेयकावरही चर्चा होणार असल्याची माहिती आहे. सरकारच्या योजनेनुसार हे बदल २०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकांपासून लागू करण्याचा विचार आहे. या निर्णयामुळे देशातील संसदीय प्रतिनिधित्वात मोठा बदल होण्याची शक्यता असून यावर राजकीय वादही सुरू झाला आहे.

विधेयकात जागांचे पुनर्निर्धारण (परिसीमन) २०११ च्या जनगणनेच्या आधारे



केंद्र सरकारचा प्रस्ताव

करण्याचा उल्लेख आहे. सध्या देशात उपलब्ध असलेली अधिकृत लोकसंख्या आकडेवारीही २०११ चीच आहे.याशिवाय, सरकार संविधान दुरुस्ती विधेयक, परिसीमनाशी संबंधित स्वतंत्र कायदा आणि दिल्ली, जम्मू-काश्मीर व पुदुचेरीसारख्या विधानसभा असलेल्या केंद्रशासित प्रदेशांसाठी स्वतंत्र विधेयकही संसदेत सादर करणार असल्याचे सांगितले जात आहे. राज्यांनुसार संभाव्य बदलांमध्ये उत्तर प्रदेशात सर्वाधिक वाढ होऊन जागा ८० वरून १२० होण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात ४८ वरून ७२, बिहारमध्ये ४० वरून ६०, तर तामिळनाडूमध्ये २०, दिल्लीत ४ आणि झारखंडमध्ये ७ जागांची वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. सध्या या प्रस्तावावर संसदेतील चर्चा आणि राजकीय घडामोडीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.

### राज्यांनुसार संभाव्य बदल असा होणार

**उत्तर प्रदेश– ८० जागा वरून १२०, महाराष्ट्रात ४८ जागावरून ७२, बिहार– ४० जागावरून ६० तर तामिळनाडूमध्ये २०, दिल्लीत ४ आणि झारखंडमध्ये ७ जागांची वाढ होण्याचा अंदाज आहे.**

### बिहारमध्ये नितीश युगाचा अस्त



विधीमंडळ नेता निवडीनंतर सम्राट चौधरी यांना शुभेच्छा देताना माजी मुख्यमंत्री तथा खासदार नितीश कुमार शेजारी इतर.

## सम्राट चौधरी मुख्यमंत्री

■ पटणा,ता.१४–

**बिहारमध्ये मोठ्या राजकीय घडामोडीत सम्राट चौधरी यांची राज्याच्या मुख्यमंत्रीपदी निवड करण्यात आली आहे. बिहार भाजपच्या विधीमंडळ पक्षाच्या बैठकीत हा सर्वसंमतीने हा निर्णय घेण्यात आला.**

नितीश कुमार यांच्या राजीनाम्यानंतर झालेला हा बदल भाजपाची आगामी व्यूहरचना अधोरेखित करणारा आहे. बैठकीत पक्षाचे वरिष्ठ नेते आणि आमदार उपस्थित होते. सर्वांच्या एकमताने चौधरी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. या निर्णयामुळे राज्याच्या राजकारणात नव्या पर्वाची सुरुवात होणार असून (पान २ वर)

## खंडणीसाठी व्यावसायिकाचा खून

### दानोळीतील घटना; दोघे ताब्यात : पोलिसांच्या दिरंगाईमुळे गावकरी आक्रमक

■ जयसिंगपूर / दानोळी,ता.१४ –

येथील भाजीपाला संघ व्यावसायिक



मयत भरतेश टोपगोंडा

**भरतेश राजगोंडा टोपगोंडा (वय ४२) या युवकाचे अपहरण करुन खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. अपहरणकर्त्यांनी २५ लाख रुपये खंडणीची मागणी केली होती.**

याबाबतची माहिती जयसिंगपूर पोलिस ठाण्यात देण्यासाठी गेली असता पोलिसांनी



संशयित आरोपी राजदीप ताडे



संशयित आरोपी मंथन पवार

कोणतीही हालचाल केली नाही. त्यानंतर नातेवाईक, मित्रमंडळी व पोलिस पाटील यांनी रात्रभर शोधाशोध केली. साधारण १२ वाजण्याच्या सुमारास भरतेश यांचा मृतदेह शेतात आढळून आला. या घटनेमुळे दानोळी परिसरात खळबळ उडाली आहे. सकाळी घराजवळच्या शेतात त्यांचा (पान २ वर)

#### संशयिताकडून मोबाईल खरेदी

तीन दिवसापूर्वी मोबाईल घेण्यासाठी संशयित जयसिंगपूर येथे आले होते. एका संशयिताने मोबाईल खरेदी केला होता. यावेळी मोबाईल दुकान चालकास गावाकडे येण्या-जाण्याची वेळ बोलण्यातून त्यांनी माहिती करून घेतली होती. मात्र दानोळी येथे खूनाच्या घटनेनंतर नवीनच प्रकार पुढे आला. आम्हाला त्या मोबाईल दुकानदाराचेच अपहरण करायचे होते.असा खुलासा देखील संशयितांनी पोलिसांसमोर केला आहे.

## मुंबईत ड्रग्ज रॅकेटचा भांडाफोड; दोघांना अटक

मुंबई,ता.१४–

**मुंबईत एका ड्रग्ज पार्टीमध्ये दोन विद्यार्थ्यांचा ओव्हरडोसमुळे मृत्यू झाला आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, आणखी एक धक्कादायक ड्रग्ज रॅकेट उघडकीस आले आहे. केवळ १३ हजार रुपये**



**भाड्याच्या छोट्या खोलीतून तब्बल ३० कोटी रुपयांचा एमडी (मेफेड्रोन) ड्रग्स व्यवसाय चालवला जात असल्याचे समोर आले आहे. अंधेरी (पूर्व) येथील सहार रोड परिसरातील भास्कर चाळीत ही बेकायदेशीर ड्रग्स फॅक्टरी सुरू होती.**

या प्रकरणी पोलिसांनी कुख्यात ड्रग तस्कर मोहम्मदआरिफ मोहम्मद इलियास शेख याचेसह अन्य एकास अटक (पान २ वर)

### नेपाळचे पंतप्रधान भारत दौऱ्यावर येणार

■ नवी दिल्ली,ता.१४–

**नेपाळमध्ये नव्या सरकारच्या स्थापनेनंतर**



**एकीकडे मोठ्या सुधारणा सुरू झाल्या आहेत, तर दुसरीकडे परराष्ट्र धोरणाच्या पातळीवरही हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. नेपाळचे नवनिर्वाचित पंतप्रधान बालेन शाह यांनी नरेंद्र मोदी यांच्या भारत दौऱ्याचे निमंत्रण स्वीकारले आहे.**

नेपाळचे परराष्ट्रमंत्री शिशिर खनाल यांनी ही माहिती दिली. त्यांनी सांगितले की, दोन्ही देशांचे परराष्ट्र मंत्रालय (पान २ वर)

| सोने प्रति तोळा | चांदी प्रति किलो |
|---|---|
| १५०४०० रु. | २४०००० रु. |

अंडी ५७५ रुपये शेकडा

#### हास्यतुषार –सुरेंद्र दास



अगं घर खर्चाला पैसे नाहीत आणि ह्या दाम दुप्पट करणाऱ्यांना कुठले पैसे देऊ ..!

## इ'करंजीत दोन गटात जोरदार हाणामारी ; १४ जणांवर गुन्हा

■ इचलकरंजी,ता.१४–

### दगडफेकीत पोलिस जखमी

**जयंतीचा जल्लोष साजरा करत असताना धक्का लागल्याच्या कारणावरुन दोन गटात जोरदार हाणामारीचा प्रकार स्टेशन रोडवर सोमवारी रात्री घडला. तर वाद मिटवण्यासाठी मध्यस्थी करणाऱ्या पोलिसासह चौघेजण दगडफेकीत जखमी झाले. या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल सद्दामहुसेन सनदी यांच्या फिर्यादीनुसार १४ जणांच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



दगडफेकीत जखमी झालेले पोलिस कर्मचारी.

याबाबत पोलिसांतून मिळालेली माहिती अशी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने स्टेशन रोडवरील पूर्णाकृती पुतळा परिसरात सोमवारी रात्री १२ वाजल्यानंतर अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने अनुयायी जमले होते. यावेळी जल्लोष साजरा करताना एकमेकांना धक्का लागल्याच्या कारणातून दोन गटात वाद झाला. (पान २ वर)

## तेरवाड-हेरवाड रोडवर अपघात; एक ठार

■ कुरुंदवाड,ता.१४(प्रतिनिधी)–

**तेरवाड-हेरवाड मार्गावर कार आणि मोटरसायकल यांच्यात जोरदार धडक होऊन झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. तर अन्य एकजण गंभीर जखमी झाला आहे.**

सेवानिवृत्त शिक्षक उत्तम नाना कांबळे (वय ५०,रा.अब्दुल लाट) असे मृताचे नाव असून धनंजय कांबळे जखमीचे नाव आहे. जखमीस सांगलीच्या दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे.तेरवाड-हेरवाड दरम्यान दर्ग्याजवळ मंगळवारी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला.

कारचालक हर्षद मेहबूब मुल्ला (रा.गुलबर्गा-कर्नाटक) हा आपल्या ताब्यातील कार क्र.(केए ३२/७३९१) घेऊन कुरुंदवाडहुन हेरवाडकडे जात होते. तर उत्तम कांबळे व धनंजय कांबळे हे हेरवाडच्या दिशेने जाताना त्यांच्या दुचाकीला कारने पाठीमागून जोरात धडक दिल्याने अपघात झाला. (पान २ वर)

### मशीनमध्ये अडकून युवकाचा मृत्यू

■ बोरगाव,ता.१४(प्रतिनिधी)–

**कागल एमआयडीसी येथील फौंड्रीत काम करीत असताना हायड्रोलिक मशीनमध्ये अडकून बोरगाव येथील युवकाचे निधन**



**झाल्याची घटना सायंकाळी पाचच्या सुमारास घडली. आरिफ दस्तगीर काजी (वय २८) असे मृत्यू झालेल्या युवकाचे नाव आहे.**

(पान २ वर)



(पान १ वरून)

## सम्राट चौधरी मुख्यमंत्री

कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. बिहारमधील सत्तांतरामुळे राजकीय समीकरणांमध्येही मोठे बदल झाले आहेत. भाजपाने नव्या नेतृत्वाच्या रूपात चौधरी यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे.आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. राजकीय वर्तुळात याबाबत जोरदार चर्चा सुरू आहे.

सम्राट चौधरी हे दीर्घकाळापासून भाजपमध्ये असून त्यांनी पक्षात विविध महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत. प्रदेशाध्यक्ष म्हणूनही त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. तसेच मंत्री आणि उपमुख्यमंत्री म्हणून त्यांना प्रशासनाचा मोठा अनुभव आहे. त्यांच्या प्रशासकीय क्षमतेला प्राधान्य देत पक्षाने त्यांची मुख्यमंत्रीपदी निवड केली आहे. चौधरी यांचा बुधवारी शपथविधी समारंभ होण्याची शक्यता असून राजभवनात तयारी सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले.

सम्राट चौधरी हे बिहारमधील प्रमुख नेत्यांपैकी एक म्हणून उदयास आले आहेत. त्यांच्या प्रभावी राजकीय रणनीती आणि संघटन कौशल्यासाठी ते ओळखले जातात. मजबूत राजकीय पार्श्वभूमी आणि दीर्घ अनुभवामुळे त्यांनी राज्यात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. त्यांनी अनेक महत्त्वाची खाती भूषवली आहेत. नंतर ते बिहार भाजपाचे प्रदेशाध्यक्ष झाले आणि २०२४ मध्ये उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली. २०२५ च्या विधानसभा निवडणुकांनंतरही ते उपमुख्यमंत्री राहिले आणि आता मुख्यमंत्रीपदी त्यांची निवड झाली आहे.

## दोन गटात जोरदार हाणामारी ; १४ जणांवर गुन्हा

या वादाचे पर्यावसान हाणामारीत झाले. यावेळी कृष्णा श्रावण कटारे, अमोल श्रावण कटारे, सिध्दार्थ नागेश विधाते, सुरज नागेश विधाते, ओंकार विधाते यांच्यासह ११ जण एकमेकांना मारहाण करत होते. त्याठिकाणी पोलीस बंदोबस्तासाठी नियुक्त सद्दामहुसेन सनदी आणि होमगार्ड बडे हे दोघे हा वाद सोडवण्यासाठी गेले. त्यावेळी अमोल कटारे

याने सनदी यांच्या डोक्यात दगड मारून जखमी केले. तर मारहाणीत साहील प्रदिप देठे, आनंदा लक्ष्मण साठे, बादल परिस दोडमणी हे चौघे जखमी झाले. जमाव ऐकत नसल्याने जादा पोलीस बंदोबस्त मागवत दोन्ही गटांना पांगवले. जखमी सनदी यांना उपचारासाठी इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयात दाखल केले आहे.

याप्रकरणी सनदी यांच्या फिर्यादीनुसार कायदेशीर कामात अडथळा करून अमोल कटारे याने धाकाने कर्तव्यापासून परावृत्त करण्यासाठी दुखापत केल्याने १४ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल झाला आहे. त्यामध्ये कृष्णा कटारे, अमोल कटारे, सिध्दार्थ विधाते, सुरज विधाते, ओंकार विधाते, साहील देठे, आनंदा साठे, बादल दोडमणी यांच्यासह ६ अनोळखींचा समावेश आहे.

## महाराष्ट्रात उष्णतेची लाट

लाटांमुळे होणारे आजार आणि मृत्यू कमी करणे तसेच असुरक्षित घटकांचे संरक्षण करणे हा आहे. आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले की, या उपाययोजनांमुळे विशेषतः अनौपचारिक कामगार, खाण कामगार आणि कमी उत्पन्न गटांना मोठा दिलासा मिळेल. या एसओपीज मध्ये बाहेर काम करणारे मजूर, रस्त्यावरील विक्रेते, वाहतूक पोलीस, स्वच्छता कर्मचारी, डिलिव्हरी कामगार आणि रिक्षाचालक यांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील उष्णता-जोखीम असलेल्या १५ जिल्ह्यांमध्ये विशेष उपाययोजना राबवण्यात येणार आहेत. यात लातूर, अमरावती, यवतमाळ, वाशिम, अकोला, बुलढाणा, नागपूर, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, जळगाव, नंदुरबार, धुळे आणि नांदेड यांचा समावेश आहे.

**तीन स्वतंत्र एसओपीचे स्वरूप**

पहिली एसओपी बाहेरील कामगारांसाठी असून कामाच्या वेळांमध्ये बदल, पाण्याचे ब्रेक, ओआरएस वितरण, सावली व्यवस्था आणि आरोग्य सुविधा मजबूत करणे यावर भर देण्यात आला आहे.

दुसरी एसओपी चंद्रपूर जिल्ह्यातील कोळसा खाण कामगारांसाठी असून थंड विश्रांती केंद्रे, वायुवीजन, जॉब रोटेशन आणि उष्णता आजार प्रशिक्षण यांचा समावेश आहे. तिसरी एसओपी उष्णता-प्रतिरोधक गृहनिर्माणासाठी असून घरांचे थर्मल सुधारणा, कूल रूफ, हरित क्षेत्रे आणि हवामान-संवेदनशील शहरी नियोजन यावर भर देण्यात आला आहे.

## नेपाळचे पंतप्रधान भारत दौऱ्यावर येणार

या दौऱ्याच्या तयारीत गुंतले आहेत. पंतप्रधान झाल्यानंतर बालेन शाह यांचा हा पहिलाच मोठा आंतरराष्ट्रीय दौरा मानला जात आहे. याआधी जून २०२३ मध्ये पुष्प कमल दहल भारताच्या अधिकृत दौऱ्यावर आले होते. दरम्यान, नेपाळची राजधानी काठमांडू येथे नव्या सरकारने १०० मुद्द्यांचा कठोर सुधारणा अजेंडा लागू केला आहे. यामागील उद्दिष्ट म्हणजे देशातील प्रशासन अधिक सक्षम करणे आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा देणे.

सरकारने हाती घेतलेल्या प्रमुख सुधारणांमध्ये व्हीआयपी संस्कृतीला पूर्णविराम देणे, शासकीय कामकाजातील विलंब कमी करणे, गरीबांसाठी मोफत आरोग्यसेवा उपलब्ध करणे, महिलांसाठी सुरक्षित सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, लहान मुलांसाठी तणावमुक्त शिक्षण व्यवस्था यांचा समावेश आहे.

## मशीनमध्ये अडकून युवकाचा मृत्यू

याबाबत माहिती अशी की, आरिफ गेल्या दोन वर्षापासून कागल एमआयडीसी येथील महालक्ष्मी फोरकास्ट या फौन्ड्रीत वेल्डर म्हणून काम करीत होता. नेहमीप्रमाणे सोमवारी आरिफ हा कामास गेला होता. कास्टिंग मशीनचे मेंटनन्स काम करीत असताना अचानक वीज पुरवठा बंद झाला. लाईट गेल्याने हायड्रोलिक दरवाजा बंद झाला. त्यामुळे हायड्रोलिक मशीनमध्ये अडकून आरिफचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच कारखान्याचे मालक व कामगारांनी धाव घेऊन आरिफ यास तातडीने जवळच्या कोल्हापूर येथील सीपीआर इस्पितळात हलविले. मात्र यापूर्वीच त्याचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. घटनेची नोंद गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्यात झाली असून पोलीस अधिक तपास करीत आहेत. आरिफ याच्या पश्चात आई-वडील बहिण असा परिवार आहे.

# अमेरिका-इराण तणावात फ्रान्सची मध्यस्थी

■ पॅरिस,ता.१४-

**पश्चिम आशियामध्ये युद्धाचे ढग दाटून आले असताना कूटनीतीची एक नवी किरण दिसू लागली आहे. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रो यांनी अमेरिका आणि इराण यांच्यात ठप्प पडलेल्या शांतता चर्चांना पुन्हा सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. मॅक्रो यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियान यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा केली आहे.**

मॅक्रो यांचा उद्देश इस्लामाबादमध्ये अपयशी ठरलेल्या शांतता चर्चांना पुन्हा सुरू करणे हा आहे. यासाठी त्यांनी तीन सूत्रांचा प्रस्ताव मांडला आहे. त्यानुसार, लेबनॉनसह संपूर्ण प्रदेशात पूर्ण युद्धविराम लागू करणे,

दरम्यान, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला आहे की इराणकडून त्यांना चर्चेचा प्रस्ताव प्राप्त झाला आहे. त्यांच्या मते, अमेरिकन नौदलाच्या घेराबंदीमुळे इराणची स्थिती कमकुवत झाली असून ते लवकरच करार करू इच्छित आहेत. तथापि, ट्रम्प यांनी पुन्हा स्पष्ट केले की इराणकडे कधीही अण्वस्त्रे असणार नाहीत.

कोणत्याही अटी किंवा करांशिवाय होर्मुज सामुद्रधुनी पुन्हा खुली करणे आणि फ्रान्स व ब्रिटनच्या नेतृत्वाखाली 'संरक्षणात्मक मिशन' सुरू करणे, ज्यामुळे समुद्रातील जहाजांची वाहतूक सुरक्षित राहील.

मॅक्रो यांनी स्पष्टपणे सांगितले की तणाव अधिक वाढू नये यासाठी 'इस्लामाबाद संवाद' तात्काळ सुरू

### पॅरिसमध्ये होणार पुन्हा मोठी बैठक

करणे अत्यावश्यक आहे. तसेच, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रो आणि ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर शुक्रवारी पॅरिसमध्ये एका परिषदेला संयुक्त अध्यक्षस्थानी राहणार आहेत. या परिषदेत युद्धात थेट सहभागी



नसलेले, पण होर्मुज सामुद्रधुनीबाबत चिंतीत असलेले देश सहभागी होणार आहेत. मॅक्रो यांच्या कार्यालयाने सांगितले की इतर सहभागी देश व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे या बैठकीत सहभागी होतील.

युरोपीय आणि इतर भागीदार देश पूर्णपणे संरक्षणात्मक मिशनमध्ये योगदान देण्यास तयार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. फ्रान्स आणि ब्रिटन गेल्या काही आठवड्यांपासून तेल टँकर आणि कंटेनर जहाजांना सुरक्षा कवच देण्यासाठी अशा मोहिमेवर काम करत आहेत.

दुसरीकडे, इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेशकियान यांनी संकेत दिले आहेत की तेहरान चर्चा करण्यास तयार आहे, मात्र त्यासाठी आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन होणे आवश्यक आहे. इराणने हेही स्पष्ट केले आहे की लेबनॉनमधील हिंसा थांबल्याशिवाय कोणताही करार शक्य नाही.

दरम्यान, प्रत्यक्ष परिस्थिती अजूनही अत्यंत नाजूक आहे. इराणने संयुक्त राष्ट्रांना पत्र पाठवून अमेरिकेची घेराबंदी ही त्यांच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन असल्याचा आरोप केला आहे. तसेच, इराणने बहरीन, सौदी अरेबिया, कतार, यूएई आणि जॉर्डन या पाच अरब देशांकडून नुकसानभरपाईची मागणी केली आहे. इराणचा आरोप आहे की या देशांनी त्यांच्या भूमीचा वापर इराणविरुद्ध अमेरिकन आणि इस्रायली हल्ल्यांसाठी होऊ दिला.

# खंडणीसाठी व्यावसायिकाचा खून

(पान १ वरून)

मृतदेह सापडला. त्यांच्या शरीरावर मारहाणीचे, कानामागे चाकूचा वार तसेच मानेवर, पोटावर, कानाला व गुप्तांगावर शॉक दिल्याच्या खुना दिसून येत होत्या. त्यानंतर त्यांचा गळा दाबून खून करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात आढळून आहे. रात्रीच अपहरण आणि मध्यरात्रीच त्यांचा खून करण्यात आल्याचा संशय आहे. भरतेशच्या पश्चात पत्नी, मुलगी, आई, भाऊ, भावजय, पुतण्या व पुतणी असा परिवार आहे.



घटनास्थळी नागरिकांनी केलेली गर्दी.

भरतेश यांचा भाजीपाल्या खरेदी-विक्रीचा संघ आहे. रात्री साधारण साडेनऊ वाजता त्यांचे चुलत बंधू महावीर यांना त्यांचा फोन आला आणि २५ लाख रुपये द्यायचे आहेत पैसे घेवून या असे सांगितले. त्यानंतर काही इतर व्यक्तीही बोलले. त्यांनी एक ठिकाण सांगितले. तेथे मित्र गेले असता तेथे कोणीच नव्हते. दोनवेळा ठिकाण बदलले. नंतर मोबाईल बंद झाला.

त्यानंतर रात्री अकरा वाजता पोलिस पाटील यांच्यासह काही मित्र व नातेवाईक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यासाठी गेले असता. पोलिसांनी गांभिर्याने घेतले नाही. पहाटे ३ वाजेपर्यंत त्यांची दखलही घेतली नाही. शेवटी बेपत्ताची नोंद घेवून सकाळी बघू असे सांगून पाठविण्यात आले. त्यानंतर मित्र व नातवाईक सकाळपर्यंत अनेक ठिकाणी शोधाशोध घेतली. मात्र भरतेश आढळून आले नाहीत. त्यानंतर खंडणी मागणीसाठी आलेल्या कॉलमधील एका व्यक्तीचा आवाज ओळखण्यात आला. त्या दिशेने गावकऱ्यांनी शोधाशोध सुरु केली. दरम्यान सकाळी १० च्या आजपास पोलिस आले. त्यांनी भरतेश यांच्या घराजवळ शोध घेवून सीसीटीव्ही पाहण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात आले.

त्यानंतर संशयीतांना गावकऱ्यांनी पोलिसांच्या ताब्यात दिले. संशयीतांनी पोलिसांना घटनास्थळी नेले. तेथे भरतेश यांचा मृतदेह आढळून आला. तेथे नागरीकांची मोठी गर्दी झाली. नागरीकांनी पोलिसांच्या तपासातील दिरंगाईमुळे युवकाचा जीव गेला असा आरोप करीत मृतदेह न हलविण्याचे निर्णय घेतला. दरम्यान आमदार राजेंद्र पाटील यड्रावकर घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी डि.वाय.एस.पी. अमोल ठाकूर यांना काही सूचना केला. लोकभावना सांगितल्या आणि लवकरात लवकर व पारदर्शी तपास करण्याच्या सूचना दिल्या. आणि नागरीकांना शांत राहण्याची विनंती केली. दरम्यान संशयित राजदीप ताडे आणि मंथन चंद्रे या दोघांना ताब्यात घेतल्याचे समजते. मात्र अद्याप नावे निष्पन्न झाली नाहीत. या घटनेमुळे दानोळीत खळबळ उडाली आहे.

**जिल्हा पोलीस प्रमुखांनी घेतली धाव**

घटनेनंतर जिल्हा पोलीस प्रमुख योगेशकुमार गुप्ता यांनी जयसिंगपूर पोलिसात तातडीने धाव घेऊन घटनेची माहिती घेतली आहे. तसेच दानोळी येथील नागरिक मोठ्या संख्येने एकत्रितरित्या यातील आणखीन आरोपींना ताब्यात घ्यावे अशा मागणीचे निवेदन देण्यात आले. दरम्यान, याबाबतचा तपास अप्पर पोलीस अधीक्षक यांच्याकडे देत आहे. या प्रकरणाचा सखोल तपास केला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## दुचाकीच्या धडकेत वृद्धेचा मृत्यू

**शिराळा,ता.१४(प्रतिनिधी)-**

शिराळा तालुक्यातील बिऊर येथील मोरणा नदीच्या पुलाजवळ अज्ञात दुचाकीस्वाराने दिलेल्या धडकेत ८० वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. किसाबाई बाळकू पाटील (रा.बिऊर,ता.शिराळा) असे मृत वृद्धेचे नाव आहे. याप्रकरणी अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध शिराळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा महिला श्री गोरक्षनाथ यात्रेसाठी आल्या होत्या. १३ एप्रिल रात्री ७.३० वाजण्याच्या सुमारास किसाबाई पाटील या बिऊर गावच्या मोरणा नदीचा पूल ओलांडून कोकरूडकडे जाणाऱ्या रस्त्याने चालत जात होत्या. यावेळी अज्ञात दुचाकीस्वाराने किसाबाई यांना समोरून जोराची धडक दिल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाली. त्यात त्यांचा मृत्यू झाला.

# मुंबईत चैत्यभूमीवर लोटला जनसागर

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मान्यवरांकडून अभिवादन

■ मुंबई,ता.१४-

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेले संविधान हे समाजपरिवर्तनाचे शक्तिशाली साधन आहे. त्यांच्या विचारांमुळेच वंचित, पीडित आणि दुर्बल घटकांना आत्मसन्मान, समान संधी, न्यायाचा मार्ग मिळाला आहे. संविधानातील घटनात्मक पायाभरणीमुळे भारताची लोकशाही सशक्त झाली आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.**



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करताना राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, श्रीमती सुनेत्रा पवार व इतर मान्यवर.

मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले कि, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले आर्थिक दृष्टिकोन, चलनव्यवस्था आणि आर्थिक स्थैर्य याविषयीचे विचार आजही कालसुसंगत आहेत. जागतिक पातळीवर अर्थकारणात होत असलेल्या बदलांच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या तत्त्वज्ञानाचे महत्त्व अधिक आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा अजित पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महापौर रितू तावडे उपस्थित होते.

## मुंबईत ड्रग्ज रॅकेटचा भांडाफोड

(पान १ वरून)

केली आहे. तो याआधी गुजरात पोलिसांच्या ताब्यातून फरार झाला होता आणि गेल्या काही महिन्यांपासून मुंबईत लपून राहत होता. तपासात उघड झाले की, आरोपीने अत्यंत साध्या स्वरूपातील खोलीत रसायने आणि उपकरणे बसवून एमडी ड्रग्स तयार करण्याची फॅक्टरीच उभारली होती. तयार होणारे ड्रग्स स्थानिक बाजारात न विकता बाहेर राज्यांमध्ये पुरवले जात होते. पोलिसांच्या अंदाजानुसार दरमहा सुमारे २५ ते ३० कोटी रुपयांचा ड्रग्स व्यवहार होत होता.या रॅकेटचा पर्दाफाश खार पोलिसांच्या गस्ती दरम्यान झाला. संशयावरून आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्याकडून १५.४४ ग्रॅम एमडी ड्रग्स आणि एक मोबाईल फोन जप्त करण्यात आला.

पुढील चौकशीत संपूर्ण नेटवर्कचा खुलासा झाला. यानंतर पोलिसांनी अंधेरीतील खोलीवर छापा टाकून ड्रग्स बनवण्यासाठी लागणारी रसायने, उपकरणे आणि साहित्य जप्त केले. या प्रकरणात आरोपीचा साथीदार रिजवान अहमद लियाकत अली यालाही उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे मुंबईतील सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले असून पोलिस या संपूर्ण ड्रग्स नेटवर्कचा पुढील तपास करत आहेत.

## तेरवाड-हेरवाड रोडवर अपघात; एक ठार

(पान १ वरून)

यामध्ये उत्तम कांबळे यांचा जागीच मृत्यू झाला तर धनंजय कांबळे हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांना सांगलीच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गेल्या आठवड्यापासून या रस्त्यावर सलग चार अपघात झाले असून यामध्ये तीन जणांचा बळी गेला आहे.

# दामदुप्पट परताव्याच्या आमिषाने फसवणूक

## वैशाली गुरवच्या घरावर पोलिसांची छापेमारी

■ कोल्हापूर,ता.१४(प्रतिनिधी)-

**गुंतवणुकीवर दुप्पट परतावा देण्याचे आमिष दाखवून फसवणूक केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या 'श्रीमंता बझार'ची एजंट वैशाली काशीनाथ गुरव (वय ३४,रा.हलकर्णी,ता.गडहिंग्लज) हिच्या घराची आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेने मंगळवारी झडती घेतली. या कारवाईत तिच्या मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे जप्त करण्यात आली असून, दोन साथीदारांचा शोधही सुरू करण्यात आला आहे.**

तपास अधिक मजबूत करण्यासाठी पोलिसांचे पथक हलकर्णी येथील तिच्या घरी दाखल झाले होते. झडतीदरम्यान बँक व्यवहार व मालमत्तेची कागदपत्रे पोलिसांच्या हाती लागली. तसेच गुरव हिने खरेदी केलेल्या दोन कार नातेवाईकांकडे दिल्याची माहिती समोर आली असून, त्या तातडीने पोलिसांकडे जमा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

चौकशीत गुरव हिला मदत करणाऱ्या दोघांची नावेही पुढे आली आहेत. गडहिंग्लज परिसरातील युवराज पाटील आणि 'शिंदे' आडनावाच्या व्यक्तीने गुंतवणूकदारांकडून पैसे गोळा करण्यासाठी मदत केल्याचे निष्पन्न झाले आहे. या दोघांचा शोध सुरु असल्याची माहिती तपास अधिकारी पोलीस निरीक्षक महेश इंगळे यांनी दिली.

या कारवाईत अंमलदार विजय काळे, प्रवीणा पाटील, रवी गायकवाड, बाबूमिया काझी व राहुल गायकवाड यांनी सहभाग घेतला. दरम्यान, गुरव हिच्या पुण्यातील घराचीही झडती घेण्याची शक्यता असून, प्रकरणाचा तपास अधिक गतीने सुरू आहे.

# भोंदू अशोक खरातला पुन्हा पोलिस कोठडी

■ नाशिक,ता.१४-

**भोंदूगिरी व महिलांच्या शोषणाच्या आरोपांमध्ये अडकलेल्या अशोक खरातच्या अडचणी आणखी वाढल्या असून, न्यायालयाने त्याला पुन्हा १८ एप्रिलपर्यंत पाच दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. तिसऱ्या गुन्ह्यातील कोठडी संपल्यानंतर त्याला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले.**

सुनावणीदरम्यान सुरुवातीला तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या, मात्र त्या दूर झाल्यानंतर प्रक्रिया पुन्हा सुरू झाली. न्यायाधीशांच्या प्रश्नांना उत्तर देताना खरातने पोलिसांकडून मारहाण झालेली नसल्याचे सांगितले. सरकारी वकील ॲड. शैलेंद्र बागडे यांनी आरोपी स्वतःला देवाचा अवतार सांगून महिलांना प्रभावाखाली आणत असल्याचा आरोप केला. महिलांना दिल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये गुंगी आणणारे घटक मिसळले जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. या माध्यमातून महिलांचे मानसिक व शारीरिक शोषण केल्याचे त्यांनी नमूद केले. तपासासाठी वापरलेले पदार्थ, तसेच भोंदूगिरीसाठी वापरलेल्या वस्तूंचा शोध घेणे आवश्यक असल्याने अधिक कोठडीची मागणी सरकारी पक्षाने केली. बचाव पक्षाने याला विरोध करत तपास पूर्ण झाल्याचा दावा केला, मात्र न्यायालयाने सरकारी पक्षाचा युक्तिवाद मान्य करून पोलिस कोठडी सुनावली.


॥ दसवा स्मृतिदिन ॥



श्री. गोपीकिसनजी बद्रीनारायणजी बाहेती

"कर्मजं बुद्धि-युक्ता हि, फलं त्यक्त्वा मनीषिणः
जन्म-बन्ध-विनिर्मुक्ताः, पदं-गच्छन्-त्यनामयम्।"

अर्थात, समबुद्धिसे युक्त ज्ञानीजन कर्मोंसे उत्पन्न होनेवाले फलको त्यागकर जन्मरुप बन्धनसे मुक्त हो निर्विकार परमपदको प्राप्त हो जाते हैं।

आपके आदर्श, आपके दिये हुये संस्कार जीवन के हर एक परिस्थितीयोंमें हमें मार्गदर्शन करते हैं। आपका आशिर्वाद हमेशा हमपर बना रहे।

मनोहर, रिषिकेश एवंम् समस्त बाहेती परिवार

■ संपादकीय ■

# काळ सोकावला


जगाचं लक्ष लागलेली अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चा नुकतीच अधुरी संपली. या चर्चेतून पश्चिम आशियातील संघर्ष निवळण्याच्या बाबतीत कुठलाही तोडगा निघू शकला नाही. दोन्ही बाजूंनी आपापले घोडे पुढे दामटल्याने त्यात फार तडजोडीला वाव राहिला नाही. मात्र संघर्ष करणारे दोन्ही देश चर्चेसाठी समोरासमोर आले आणि त्यांनी थेट आपापली भूमिका एकमेकांना समजावून सांगितली, त्यातूनच पुढे तडजोडीची संधी निर्माण होऊ शकते हे तितकेच खरे आहे. या चर्चेबाबत जगभरातून जे रिपोर्ट्स आले आहेत, त्यात एक मुद्दा कॉमन आहे की दोन्ही देशांमधील मतभेद बऱ्यापैकी कमी झाले असून आता फक्त तीन ते चार महत्त्वाच्या मुद्द्यांवर तडजोड होणे बाकी आहे. अर्थात, ही चर्चा फिस्कटल्याने इराणवर लगेच हल्ले सुरू करण्याचा कोणताही इशारा अमेरिकेने दिलेला नाही. आज त्यांनी फक्त होर्मुझ सामुद्रधुनीमधून जाणाऱ्या जहाजांना प्रतिबंध करण्याची घोषणा केली आहे. म्हणजे इराणला टोल देऊन जी जहाजे पुढे जाऊ इच्छितात त्यांना आता अमेरिका अडवणार आहे. याद्वारे इराणची आर्थिककोंडी करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे, पण त्यातून जागतिक तेल संकट अधिक गडद होणार आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे अमेरिका आणि इराण यांच्यातला थेट संघर्ष पुन्हा सुरू झालेला नसला, तरी तेल पुरवठ्यातील अडथळा मात्र आणखी गंभीर बनला आहे. या सगळ्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर एक मुद्दा ठळकपणे जगाच्या पुढे आला, तो हा की, आजपर्यंत दहशतवादी देश म्हणून हिणवला गेलेला पाकिस्तान आता अचानक शांतीदूत म्हणून पुढे येऊ पाहतो आहे. इराण आणि अमेरिका या दोन्ही देशांची शिष्टमंडळे पाकिस्तानात एकत्र आली होती आणि त्यांच्यात मध्यस्थी घडवून आणण्यासाठी पाकिस्तानने प्रयत्नांची शिकस्त केली. त्यामुळे गेले अनेक दिवस जगाच्या दृष्टीने दुर्लक्षित ठरलेला पाकिस्तान आज चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. आणि त्यातून त्यांच्या प्रतिमेत बऱ्यापैकी सुधारणा झाली आहे. पण यामुळे पाकिस्तानला जे नाहक महत्त्व मिळत आहे ते मात्र अनाठाई आहे असेच म्हटले पाहिजे. कारण आजही पाकिस्तानमध्ये अनेक आंतरराष्ट्रीय दहशतवादी आश्रयाला आहेत, त्यात मौलाना मसूद अजहरपासून दाऊद इब्राहिमपर्यंतच्या अनेक कुख्यात दहशतवाद्यांचा समावेश आहे. भारताने गेली दोन दशके सातत्याने प्रयत्न करून पाकिस्तान दहशतवादाला कसा आश्रय देत आहे हे जगाच्या व्यासपीठावरून ओरडून सांगितले आणि अनेक महत्त्वाचे पुरावे जागतिक व्यासपीठावर उपस्थित करून पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगापुढे आणण्याचे काम गेल्या दोन दशकात भारताने केले. या पार्श्वभूमीवर आज अचानक जर पाकिस्तान शांतीदूत म्हणून पुढे येत असेल तर ते भारतासाठी धोकादायक आहे. आता आपल्या सुधारलेल्या प्रतिमेच्या आधारे पाकिस्तान पुन्हा भारताच्या विरोधात बिनदिक्कतपणे दहशतवादी कारवाया करू शकतो आणि त्यावेळी जागतिक व्यासपीठावरून भारताचे समर्थन होण्याऐवजी पाकिस्तानच्या बाबतीतच सहानुभूती दाखवली जाण्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे पाकिस्तानची ही बदललेली प्रतिमा भारतासाठी धोक्याची घंटा आहे. अर्थात, इराण आणि अमेरिका यांच्यात मध्यस्थी घडवून आणण्याचे प्रयत्न केल्याने पाकिस्तान एकाएकी, वाल्याचा वाल्मिकी ठरू शकत नाही हेही तितकेच खरे आहे आणि जबाबदार जागतिक नेत्यांना याची जाणीवही आहे. आता प्रश्न फक्त एवढाच आहे की पाकिस्तानला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर आज जे महत्त्व मिळाले त्याला भारत किंवा भारताचे नेतृत्व जबाबदार आहे काय? अनेक आंतरराष्ट्रीय विश्लेषकांच्या मते, भारताच्या विदेश धोरणापेक्षा आज पाकिस्तानची विदेशनीती सरस ठरली आहे. भारतीय पंतप्रधानांनी युद्धाच्या दोन दिवस आधी इस्रायलचा दौरा करणे आणि थेट इस्रायलचे समर्थन करणे ही भारताच्या आजपर्यंतच्या समजूतदार विदेशनीतीतील मोठी चूक मानली गेली आहे. त्यातूनच इराण आणि अमेरिका या दोन देशांनी आपापसातील चर्चेसाठी भारताऐवजी पाकिस्तानची निवड केली. पाकिस्तान मध्यस्थीसाठी जशा हालचाली करू लागला तसा भारतातील सत्ताधाऱ्यांचा त्रागा वाढू लागल्याचे आपण सगळ्यांनीच पाहिले. परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी तर, या घडामोडीवर 'आम्ही पाकिस्तान सारखे दलाल देश नाही' अशी टोकाची प्रतिक्रिया दिली. ती भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री पदावरील व्यक्तीला शोभणारी नक्कीच नव्हती. या सगळ्या घडामोडी पाहिल्यानंतर आणि पाकिस्तानचे नाहक वाढलेले महत्त्व पाहिल्यानंतर भारताला आता अधिक जबाबदारीने जागतिक व्यासपीठावरून आपली भूमिका अधोरेखित करावी लागेल. भारताकडे विदेशनीती हा एकच असा मुद्दा होता की तेथे सत्ताधारी आणि विरोधक नेहमीच एकजुटीने वागत आले होते, पण यावेळी मात्र मोदी सरकारने या समजुतीला फाटा देत विदेशनीतीच्या बाबत चुकीचा मार्ग पत्करला आणि त्यातून पाकिस्तानचे महत्त्व वाढून काळ सोकावण्यास मदत मिळाली आहे.

# गूढ भूकंपाच्या धक्क्यांचे

**विदर्भ आणि मराठवाडा परिसर अलीकडेच भूकंपाच्या सौम्य ते मध्यम स्वरूपाच्या धक्क्याने हादरला. वाशिम शहर, यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुक्यात शेंबाळ पिंपरी, नांदेड शहर व परिसर, हिंगोली तालुक्यातील पांगरा शिंदे येथे हलके ते मध्यम धक्के बसल्याची नोंद झाली. काही ठिकाणी भूकंपाच्या वेळी भूगर्भातून मोठा आवाज ऐकू आल्याचे नागरिकांनी सांगितले.**

हिंगोली जिल्ह्यातील पांगरा शिंदे येथे झालेल्या भूकंपाची तीव्रता रिश्टर स्केलवर ४.७ इतकी नोंदवण्यात आली आहे. गत काही वर्षांत या भागात भूकंपाच्या घटनांमध्ये वाढ झाली असून प्रशासनाने याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. यापूर्वी या भागात ४.५ तीव्रतेचे धक्के नोंदवले गेले होते मात्र यावेळी तीव्रता अधिक असल्याने सुमारे ३० ते ३५ टन ऊर्जा निर्माण झाली आहे. आगामी काळात भूकंपाचे धक्के वाढत गेले तर मोठ्या भूकंपाची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे भूकंपप्रवण क्षेत्राचे सखोल भौगोलिक सर्वेक्षण करून कारणांचा शोध घेणे गरजेचे आहे. ३० ऑक्टोबर १९९३ रोजी किल्लारी येथे झालेल्या विध्वंसक भूकंपानंतर मराठवाड्यातील ही सर्वात मोठी घटना मानली जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, या पार्श्वभूमीवर भूकंपरोधक बांधकामाची गरज अधिक अधोरेखित होते. विशेषतः माती व दगडांच्या घरांना धोका अधिक असून मजबूत आणि नियोजनबद्ध बांधकाम असलेल्या घरांचे नुकसान तुलनेने कमी होते त्यामुळे भविष्यातील धोका टाळण्यासाठी बांधकाम पद्धतीत बदल करणे आवश्यक आहे.भूकंपाच्या भूगर्भीय कारणांबाबत विचार करता, जमिनीखालील पाण्याचा साठा, पावसाचे प्रमाण आणि भौगोलिक रचना यांचा सखोल अभ्यास करणे गरजेचे आहे. हैदराबादमधील भूकंपशास्त्र संस्थांच्या मदतीने या भागाचा अभ्यास केल्यास भविष्यातील धोके ओळखता येऊ शकतात. हिंगोली जिल्ह्यात उभारण्यात येत असलेल्या महत्त्वाच्या लिगो प्रकल्पावरही या भूकंप मालिकेचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सुरुवातीला हा भाग भूकंपमुक्त मानला जात होता मात्र २०२० नंतर येत असलेल्या धक्क्यांमुळे आता या प्रकल्पाबाबत पुन्हा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.अलिकडे मराठवाडा व विदर्भातील हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वाशिम या जिल्ह्यांत सौम्य ते मध्यम भूकंप वारंवार होत आहेत.पालघर, नाशिक आणि पुणे परिसरातही हलक्या धक्क्यांची नोंद झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, कोयना-वारणा पट्टा भूकंप प्रवण असून भूकंपरोधक बांधकाम आणि सतर्कता आवश्यक आहे. नांदेड जिल्ह्यात अनेक भागांत भूकंपाचा धक्का जाणवला. हिंगोली जिल्ह्यातील शिंदे पांगरा हे भूकंपाचे केंद्रस्थान असल्याचे सांगण्यात येते.या परिसरात अनेक घरांना तडे गेले आहेत. काही गावातील सार्वजनिक सभागृहांना तसेच मंदिरांना तडे गेले आहेत. पांगरा शिंदे गाव भूकंपाच्या केंद्रस्थानी आहे की नाही हे अद्याप निश्चित नाही. कारण केंद्र असेल त्या भागात नुकसान कमी असते; पण भूकंपाचा धक्का मोठा होता. हिंगोली जिल्ह्यातील भूकंपाचे धक्के यवतमाळ जिल्ह्यातही बसले.



मराठवाड्याच्या सीमावर्ती भागांना पुसद शहर आणि वसंतनगर परिसरालाही भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले.सुदैवाने जिल्ह्यात कोठेही जीवित वा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही मात्र या नैसर्गिक घटनेमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजीच्या अहवालानुसार भूकंपाचा केंद्रबिंदू हिंगोली जिल्ह्यात होता. जमिनीच्या आत काही किलो मीटर खोलीवर झालेल्या या हालचालींमुळे हिंगोलीसह यवतमाळ, नांदेड आणि परभणी जिल्ह्यातील काही भागांत कंपने जाणवली. ग्रामीण भागात भांडी वाजणे, खिडक्यांची तावदाने थरथरणे यासारखे प्रकार घडले. भूकंपानंतर सोशल मीडियावर विविध अफवांना ऊत आला. भूकंप हा नैसर्गिक बदल असून अफवांवर विश्वास ठेऊ नका, असे प्रशासनातर्फे सांगण्यात आले. जर पुन्हा धक्के जाणवले तर इमारतींमध्ये न राहता तात्काळ मोकळ्या मैदानात अथवा सुरक्षित ठिकाणी आश्रय घेतला पाहिजे. लिफ्टचा वापर टाळला पाहिजे. हा नैसर्गिक बदल आहे.


**दैनंदिनी**

भूगर्भातील हालचालींमुळे प्रचंड प्रमाणावर ऊर्जेचे उत्सर्जन होते आणि त्यामुळे भूकंप लहरी तयार होऊन पृथ्वीच्या पृष्ठभागाची हालचाल होते. परिणामी जमीन थरथरणे, हलणे, जमिनीला भेगा, कंपन होते अथवा भूकवच अचानक काही क्षण हादरणे यासारख्या घटना घडतात यालाच भूकंप असे म्हणतात. भूकंपामुळे भूपृष्ठाचा भाग मागे-पुढे किंवा वर-खाली होतो. जमिनीखाली असलेल्या भूकंपाच्या उगमस्थानास भूकंपनाभी असे म्हणतात तर भूकंपनाभीच्या अगदी वर म्हणजेच भूपृष्ठावर असलेल्या बिंदूस भूकंपाचा केंद्रबिंदू असे म्हणतात. भूकंप हा सर्वात वाईट नैसर्गिक धोक्यांपैकी एक आहे. भूकंपामुळे व्यापक प्रमाणात विनाश आणि मानवी जीवांचे नुकसान होते. भूकंप प्रामुख्याने पृथ्वीच्या कवचाच्या कोणत्याही भागामध्ये समतोल नसल्यामुळे होतो. भूकंपाचा केंद्रबिंदू असलेल्या पांगरा शिंदे गावात भूकंपामुळे सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत म्हणे. या गावात आई-वडील आपली मुलगी देण्यास तयार नाहीत म्हणे. या गावातील नागरिकांना शेती क्षेत्र कमी असल्याचे तसेच सातत्याने भूकंपाचे धक्के जाणवत असल्याने गावात नातेसंबंध करण्यासाठी टाळाटाळ होत असल्याचे बोलले जात आहे. या सामाजिक समस्यांमुळे गावात दोनशेहून अधिक तरुण विवाहाच्या प्रतीक्षेत आहेत म्हणे!

# पंचगंगेच्या प्रदुषणाचा अतिरेक

**जगातील अतिप्रदुषित नद्यांमध्ये 'पंचगंगा' नदीची नोंद अग्रक्रमाने होते. उगमापासून संगमापर्यंत पंचगंगेत मिसळणारे काठावरील साखर कारखान्यांचे मोलॅसीस, मळीयुक्त, कोल्हापुरातील अनेक नाल्यातून मिसळणारे मैलायुक्त, काठांवरील गावातील वापरलेले सांडपाणी आणि औद्योगिक नगरी इचलकरंजीतील प्रदुषित पाणी पंचगंगेत सोडले जाते.**

या नदीच्या काठावरील गावे वर्षेनुवर्षे 'काळ्या पाण्याची' शिक्षा भोगत आहेत. अतिप्रदुषणामुळे जलचर प्राण्यांचा मृत खच नेहमी पडत असतो. जनावरांनाही अशा पाण्यामुळे अनेक व्याधी होऊन पशुधनही नष्ट होत आहे. काठावरील माणसांना,सर्दी, खोकला, काविळ, टायफाईड, त्वचारोग या आणि अशा व्याधीमुळे दवाखान्यांची भरपेट भरती केली जातेय. प्रदुषित पाण्याबाबत अनेक सामाजिक कार्यकर्ते वारंवार आवाज उठवितात. प्रदुषण मंडळाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरतात, त्यांच्या कार्यालयात मृत मासे टाकतात, घाण पाणी पिण्याचा आग्रह धरतात, अधिकाऱ्यांना घेरावो घालणे, ऑफिसला टाळे ठोकणे असे अनेक चळवळीचे अस्त्र उगारून ही प्रदुषण मंडळ ढिम्म आहे. अनेक वर्षे ग्रामीण भागातील जागृत कार्यकर्ते याबद्दल आवाज उठवतात. विश्वास बालीघाटे, सुरेश सासणे, कॉ.आप्पा पाटील,जनहित याचिका दाखल केलेले मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते व 'पंचगंगा प्रदुषित मुक्ती संघर्ष समिती'चे सर्व कार्यकर्ते आवाज उठविणेचे, जागृती करण्याचे काम करताहेत.



सेवादल,अंनिसचे कार्यकर्ते आठवड्याला नदी परिसरातील स्वच्छता करतात. केंदाळ काढण्याचा प्रयत्न करतात. परंतु इथलं केंदाळ काढले तरी वरून त्यापेक्षा अधिक प्रमाणात येते. त्याचे प्रमाण एवढे आहे की, त्या जलपर्णीतून पाणी दिसतच नाही. जलपुरुष राजेंद्र राणा ३/४ वेळा इथे येऊन गेले. त्यांनी मौलिक सूचना, सल्ले, पर्याय दिले.प्रशासक पातळीवर ते शक्य आहे असे ठामपणे सांगितले. अनेक उदाहरणे दिली पण 'येरे माझ्या मागल्या.' या शहरात चळवळीतील जागृत नागरिकांसह संदिप चोडणकरसारखे पर्यावरण अभ्यासक वारंवार लेख, व्याख्याने देतात. देशात, परदेशातही त्यांना निमंत्रित केले जाते. पण प्रदुषणासंबंधी अशा कार्यकर्त्यांची पालिका, प्रदुषण मंडळ दखल घेत नाहीत. कुणी व्यक्तीशः अशा घटनाबद्दल तक्रार केली तर अर्थाअर्थी त्यांचे तोंड बंद केले जाते. कोल्हापुरातील काही अभ्यासू मंडळींना पाचारण केले जाते. मात्र नेहमी केवळ चर्चाच केली जाते.

महानगरपालिकेच्या माध्यमातून, प्रशासनामार्फत प्रदुषण मंडळ, आमदार, खासदार, नामदार, सरकार निवडणूका आल्या की नुसत्या वल्गना, घोषणा, आश्वासने देतात. पण प्रत्यक्षात शाश्वत कार्यवाही होत नाही. कुणांकडं तक्रार करावी, दाद मागावी आणि न्यायाची अपेक्षा करावी हे समजतच नाही. गत आठवड्यात 'अंकुश' संघटनेने काळा ओढा आडवण्याचे आंदोलन केले नेहमीप्रमाणे तोंडाला पाने पुसून अधिकाऱ्यांनी जुजबी सुटका करून घेतली. आश्वासनपूर्ती न केल्यामुळे येत्या १७ तारखेला पंचगंगेच्या काठावरील सर्व गांवे बंद करून पुन्हा काळा ओढा आडविण्याचे जाहीर केले असून 'पंचगंगा प्रदुषण मुक्ती संघर्ष समिती' यामध्ये भागीदारी करणार आहे. तरी इचलकरंजी आणि परिसरातील पर्यावरण प्रेमींनी या आंदोलनात सहभागी व्हावे.

■ बजरंग लोणारी

गर्दीच्या ठिकाणी घडणाऱ्या चेंगराचेंगरी च्या घटना भयानकच असतात. ३१ मार्चला नालंदा (बिहार) येथील श्री शीतला माता मंदिरात चेंगरा चेंगरी होऊन नऊ भाविकांचा मृत्यू झाला. भारत हे जगाचे देवघर आहे. मंदिरे, धार्मिक सण उत्सव, जत्रा आदी या राष्ट्रासाठी चैतन्याचे स्रोत आहे. त्यामुळे अशा कार्यक्रमानिमित्त लाखो भावी देवदर्शनाला जातात, तेथे जाऊन कुळधर्म, कुळाचार करतात, नवस बोलतात, प्रथा परंपरा जपतात, आणि त्या माध्यमातून आत्मिक समाधान शोधतात. परंतु या पवित्र स्थळींच वारंवार घडणाऱ्या चेंगराचेंगरीच्या घटनांकडे केवळ अपघात म्हणून पाहणे चुकीचे ठरेल.

# मंदिरातील गर्दीचे नियोजन गरजेचे

अशा घटनामागील नेमके कारण कळणे पुष्कळ कठीण असते याचा आपलाभ उठत प्रशासकीय यंत्रणा अशा घटनांना अफवा कारणीभूत असल्याचे सांगून मोकळ्या होतात. अफवा केवळ योगायोगानेच पसरतात का? कि यामागे काही समाजकंटकांचे नियोजित षड्यंत्र आहे. या दृष्टीने सखोल आणि व्यापक अन्वेषण होणे गरजेचे आहे.जर खरोखरच काही विघातक शक्ती अशा धार्मिक कार्यक्रमांना लक्ष करत असतील तर तो केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नसून राष्ट्रीय सुरक्षेचाही आहे.

गर्दी नियंत्रण हे एक शास्त्र आहे त्यासाठी सूक्ष्म नियोजन, पूर्व सिद्धता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक आहे. दुर्दैवाने प्रत्येक घटनेनंतर त्यावर उपाय म्हणून धार्मिक प्रथा परंपरांवर बंदी घालणे, श्रीफळ वाढवणे विशिष्ट पद्धतीने दर्शन घेणे अशा काही प्राचीन धार्मिक परंपरांवर थेट बंदी घातली जाते. काही ठिकाणी अशा घटनेचे निमित्त करून थेट मंदिर बंद करणे किंवा ते सरकार स्वतःच्या नियंत्रणात घेते. हे करताना कुठल्याही धर्माचार्यांचे मत विचारात घेतले जात नाही.अशा घटनांमध्ये भाविकांचेही काही दायित्व असते हे नाकारता येत नाही. अनेकदा भाविक संयम सोडतात, रांगेचे नियम मोडतात, अफवांवर विश्वास ठेवतात, ढकलाढकली करून घाई गर्दीत पुढे जाण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे ही गर्दी अनियंत्रित होऊन चेंगराचेंगरी सदृश्य परिस्थिती निर्माण होते. यावर उपाय म्हणून शालेय स्तरापासून गर्दी व्यवस्थापनाचे धडे दिले गेले पाहिजेत. यासह मोठ्या धार्मिक कार्यक्रमासाठी गर्दी व्यवस्थापन आराखडा सिद्ध करणे, प्रशासनासाठी बंधनकारक केले पाहिजे. प्रवेश आणि निर्गमन मार्ग वेगळे ठेवणे, ठराविक क्षमतेनुसार भाविकांना प्रवेश देणे, असेंबलींग पॉइंट असणे, आपत्कालीन परिस्थितीत सुरक्षित बाहेर पडण्याची व्यवस्था असणे, सीसीटीव्ही, ड्रोन, डिजिटल टोकन प्रणाली यासारख्या तंत्रज्ञानाचाही वापर वाढवला पाहिजे. पोलीस आणि स्वयंसेवक यांना विशेष प्रशिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवले पाहिजे. यासह भाविकांमध्ये ही जनजागृती केली पाहिजे.अफवा रोखण्यासाठी तात्काळ माहिती देणारी आणि जनतेशी संवाद साधणारी यंत्रणा उभी केली पाहिजे, तसेच अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी विशेष कायदेशीर प्रावधने लागू केली पाहिजेत. मंदिरातील चेंगराचेंगरी सारख्या घटना पोलीस आणि प्रशासन यांची अकार्यक्षमता आणि नियोजन शून्य कारभार कारणीभूत असतो. अशा घटनांकडे केवळ अपघात म्हणून पाहणे चुकीचे ठेल अशा घटनांमुळे कुटुंबाच्या कुटुंब उद्ध्वस्त होतात. योग्य नियोजन, दायित्वाची जाणीव, शिस्तबद्धता आणि प्रामाणिक कारवाई असेल तर अशा घटना सहज टाळता येतील.



■ लीना गाडगीळ

## दैनिक पंचांग(सुर्योदयकालीन ग्रहस्थिती)




**बुधवार ता.१५.४.२०२६**,विक्रमसंवत २०८२,शिवशक ३५२, शालिवहन शके १९४८,पराभवनाम संवत्सरे, उत्तरायणे, वसंत ऋतो, चैत्र मासे, कृष्ण पक्षे, त्रयोदशी तिथी,२२.३२ नंतर चतुर्दशी तिथी, पूर्वा भाद्रपदा नक्षत्र, १५.२३ नंतर उत्तरा भाद्रपदा नक्षत्र, कुंभ रास, ९.३८ नंतर मीन रास, ब्रम्हा योग, १३.२६ नंतर ऐंद्र योग, गरज करण ११.२८ नंतर, वणिज करण २२.३२ पर्यंत,दिनमान १२.२३, सुर्योदय ६.२१, सुर्यास्त १८.४५ (कोल्हापूरचे), राहू काळ दुपारी १२ ते १.३०, प्रदोष, शिवरात्री, अक्कलकोट स्वामी पु.दि., भद्रा २२.३२ नंतर, जनावर देणे घेणे, स्थावर कामे, माल विक्री, संतश्रेष्ठ गोरोबाकाका पु.दि.

**ज्यो:केशव पेटकर महाराज–९६०४७०९१५९**

## ✻ राशीभविष्य

**मेष–**धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. गृहशांतीसाठी शुभ आणि पवित्र दिवस. ज्यामुळे तुमचे चांगलेच धन खर्च होऊ शकते.

**वृषभ–** कौटुंबिक व्यावसायिक प्रकल्प सुरु करण्यास शुभ दिवस. चांगले यश मिळण्यासाठी कुटुंबातील इतर सदस्यांची मदत घ्या. वेळेचा सदुपयोग करणे शिका.

**मिथून–**आज तुम्हाला आपल्या संतानमुळे आर्थिक लाभ होण्याची शक्यता दिसत आहे यामुळे तुम्हाला बराच आनंद होईल.

**कर्क–** अनेक दिवस प्रलंबित असणाऱ्या निर्णयांना अंतिम स्वरूप मिळेल आणि नवे संयुक्तिक प्रकल्प मार्गी लागतील. आज तुमचे चांगलेच धन खर्च होण्याची शक्यता आहे.

**सिंह–** आजच्या दिवशी तुम्हाला धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे. परंतु, या सोबतच तुम्ही दान-पुण्य ही केले पाहिजे कारण यामुळे तुम्हाला मानसिक शांती मिळेल.

**कन्या–** गुंतवणूक करणे बऱ्याच वेळा तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल आज तुम्हाला ही गोष्ट लक्षात येऊ शकते कारण जुन्या गुंतवणुकीतून तुम्हाला उत्तम नफा होऊ शकतो.

**तुळ–** धनाने जोडलेल्या काही गोष्टींतून मार्ग निघू शकतो आणि तुम्हाला धन लाभ होऊ शकतो. आपल्या उदार स्वभावाचा फायदा मित्रांना घेऊ देऊ नका.

**वृश्चिक–**जे लोक शेअर बाजारात पैसा लावतात आज त्यांना फायदा होऊ शकते. वेळेवर सचेत राहणे तुमच्यासाठी उत्तम असेल.

**धनु–** काही लोकांना आज संतान पक्षाकडून आर्थिक लाभ होण्याची अपेक्षा आहे. तुमच्या कलात्मक क्षमतेमुळे अनेक लोकांची कौतुकाची थाप मिळेल आणि बक्षिसही मिळेल.

**मकर–** भविष्यात जर तुम्हाला आर्थिक रूपात मजबूत बनायचे आहे तर, आजपासूनच धन बचत करा. आजच्या दिवसाचे खूप काळजीपूर्वक नियोजन करा.

**कुंभ–**तुम्ही जर काम करत असाल तर व्यावसायिक करारांवर काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे. छोट्या मोठ्या गोष्टींचा मनावर परिणाम होऊ देऊ नका.

**मीन–** आर्थिक पक्ष मजबूत होण्याची पूर्ण शक्यता आहे. जर तुम्ही कुठल्या व्यक्तीला पैसा उधार दिला आहे तर, आज तो तुम्हाला तो पैसा परत मिळण्याची शक्यता आहे.

## वाचकांचा पत्रव्यवहार

### महिला आयोग अध्यक्षाविना

गेल्या दोन महिन्यांपासून राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद हे रिक्त आहे. राज्यात घडलेल्या खरात प्रकरणाने चाकणकरांच्या अध्यक्षपदाचा राजीनाम्यानंतर अद्यापही हे पद न भरल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. राज्यात वाढलेल्या महिलांवरील अत्याचाराच्या घटना पाहता अध्यक्षपदासाठी सक्षम महिलेचा विचार करून राज्य सरकारने तातडीने नेमणूक करणे अत्यावश्यक आहे. मागील काही वर्षांत अनेक महिलांवरील अत्याचारांच्या घटनांनी कळस गाठला आहे.त्यासाठी महिला आयोगाचे पाठबळ मिळायला हवे. तेवढे मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे.राज्य सरकारने राजकीय फायदा न पाहता महिलांना योग्य न्याय देणाऱ्या सक्षम महिलेची महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी निवड करावी, अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.

■ शशिकांत जाधव

### वेळीच उपाययोजना हव्यात

कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर रायतेजवळ झालेल्या भीषण अपघातात अकरा प्रवाशांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत वेदनादायक आहे. हा भीषण अपघात आपल्या वाहतूक व्यवस्थेतील त्रुटी अधोरेखित करतो तसं म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. तसं पाहिलं तर ग्रामीण भागात एसटी बसेसची, परवानाधारक वाहनांची कमतरता नेहमीच जाणवते. सहाजिकच नाईलाजाने बेकायदा वाहतुकीचा आधार घ्यावा लागतो. दुर्दैवाने, अशा घटना घडल्यानंतर प्रशासनाने हालचाल करण्यापेक्षा सतर्क राहून वाहतूक व्यवस्थेवर उपाययोजना, प्रवाशांच्या अडचणी, समस्यांकडे वेळीच लक्ष देत राहिल्यास असे भीषण प्रसंग उद्भवणार नाहीत.

■ विश्वनाथ पंडित

### शरद पवारांची अभ्यासपूर्ण टिप्पणी!

वारकरी संप्रदायासारख्या समतेच्या चळवळीतही प्रतिगामी लोक घुसखोरी करू लागले आहेत अशी ज्येष्ठ नेते राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार)पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केलेली चिंतायुक्त अभ्यासपूर्ण टिप्पणी चर्चेत आहे. वारकरी संप्रदायातील ६० टक्के लोक धर्मांध शक्तींना अधिक बळ मिळेल, अशी मांडणी करीत असतात. ही चिंतेची बाब आहे. मात्र यातील ४० टक्के लोक किर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून पुरोगामी भूमिका मांडताना दिसतात हे योग्यच होय. तथापि प्रबोधनाच्या या मार्गात महिला कुठे दिसत नाही ही शरद पवार यांनी व्यक्त केलेली खंत रास्तच आहे. धर्माधर आधारित फुटीचा राजकारणाला केंद्र सरकारपासून सगळ्या सरकारी यंत्रणा मदत करीत आहेत हे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे अभ्यासपूर्ण मत काळजी वाटावला लावणारे आहे. जात-पात व धर्म न सांगणाऱ्या वा न मानणाऱ्या वारकरी संप्रदायाला हजारो वर्षाची परंपरा आहे. या परंपरेला कुणाचे गालबोट लागता कामा नये. माणूस ही जात आणि मानवता हाच धर्म ही या वारकरी संप्रदायाची खरी ओळख आहे. म्हणूनच या अलौकिक परंपरा लाभलेल्या वारकरी संप्रदायात कुणा प्रतिगाम्यांची घुसखोरी होत असेल तर ती खरेच चिंतेची बाब होय. सामान्य जनतेच्या अपरिपक्वतेमुळे प्रतिगामी, धर्मांध शक्तींना मिळालेली राजकीय सत्तेची जोड या सोबत चिंताजनक ठरू पाहत आहे. यावर सामान्य जनतेने व समाज धुरिणांनी अधिक गंभीर चिंतन करण्याची वेळ प्रकर्षाने आज आलेली आहे.



■ श्रीकांत जाधव

महासत्ता हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक वसंतराव कृष्णाजी दत्तवाडे यांनी तरुण आर्टस् अॅन्ड प्रेस, गट नं. ४४४/२/३-ए , महासत्ता चौक, इचलकरंजी येथे छापून इचलकरंजी, सांगली, कराड व सातारा येथील कार्यालयातून प्रसिद्ध केले. आर.एन्.आय.रजि.नं. ६३११९/९४ मुख्य कार्यालय:'मॅंचेस्टर भवन' ४४४ /२/३-ए, महासत्ता चौक, इचलकरंजी-४१६११५., दूरध्वनी क्रं.-०२३०-२४३४३४५ संपादकीय विभाग,२४३४३४३ जाहिरात विभाग, फॅक्स क्र. २४३५५११. विभागीय कार्यालय- मुंबई -दूरध्वनी क्र. २२६२४५६० , पुणे - दूरध्वनी २४४९१०६०, सातारा दूरध्वनी क्र. २३३४०१. कराड -दूरध्वनी क्र. २२४५६४ , इस्लामपूर- २२४११९., सांगली - दूरध्वनी क्रं.२३७३७५५.❋ कोल्हापूर - दूरध्वनी क्रं. २५४५४०१ , गडहिंग्लज - दूरध्वनी क्र.२२२९४९., निपाणी- दूरध्वनी क्रं.२२२१६५., चिकोडी दूरध्वनी क्र.२७३०३१. टीप- पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी जाहिरात प्रतिनिधी श्री. दि. पा. मोमीन यांचेवर राहील. मा. संपादक किंवा व्यवस्थापकीय संपादक यांचेवर रहाणार नाही.

